पाहिजेत !! राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४
एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.
प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह
एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट
गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...
शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.
राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...
गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३५७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०७ ऑगस्ट २०२५




## उत्तरकाशीत हाहाकार! ढगफुटीनंतर महापुरात अर्धे गाव गाडले

### चौघांचा मृत्यू, अनेक बेपत्ता



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, उत्तरकाशी :** उत्तरकाशीमध्ये मंगळवारी दुपारी रहिवासी आणि भाविकांनी निसर्गाचे रौद्ररूप अनुभवले. खीर गंगा नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या ढगफुटीनंतर आलेल्या भीषण महापुरामुळे गंगोत्रीच्या मार्गावरील धराली गावाचा सुमारे अर्धा भाग चिखलात गाडला गेला. या नैसर्गिक संकटात चौघांचा मृत्यू झाला असून, ६०-७० जण चिखलात अडकल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

धराली गाव हे गंगोत्रीच्या मार्गावरील मुख्य थांबा असल्याने इथे नदीच्या काठावर हॉटेल, रेस्टॉरण्ट तसेच होम स्टे यांची संख्या मोठी आहे. ढगफुटीनंतर वाहणाऱ्या पाण्याच्या प्रवाहातून मोठ्या प्रमाणात माती, दगडगोटे आणि दरड डोंगरावरून खाली आल्याने अक्षरशः चिखलाचा महापूरच आला. हा महापूर नदीचा प्रवाह सोडून गावात शिरल्याने अखखे धराली गाव चिखल आणि दगडगोट्यांमध्ये गाडले गेले. या महापुरात येथील घरे, वाहने, झाडे, हॉटेल, रेस्टॉरण्ट, तीन-चार मजली होम स्टे अगदी कस्पटाप्रमाणे वाहून गेली.

प्राथमिक माहितीनुसार, महापुरामुळे चौघांचा मृत्यू झाला असल्याचे उत्तरकाशीचे जिल्हा दंडाधिकारी प्रशांत आर्य यांनी सांगितले. ढगफुटीनंतर स्थानिकांनी मोबाइलमध्ये कैद केलेल्या व्हिडीओ क्लिप व्हायरल झाल्या असून, या ताज्या दृश्यांमध्ये निसर्गाचे रौद्ररूप पाहायला मिळते. डोंगरावरून प्रचंड वेगाने खाली झेपावणारे चिखलमिश्रित पाण्याचे लोट वाटेत येणारी झाडे, घरे, हॉटेल व अन्य इमारतींना क्षणार्धात ध्वस्त करत पुढे सरकताना दिसतात. एकाच डोंगरावरून दोन वेगवेगळ्या बाजूंनी पाण्याचे लोट प्रचंड वेगाने खाली आले. एक प्रवाह धरालीकडे आणि दुसरा सुक्की गावाकडे गेल्याचे राज्य आपत्ती व्यवस्थापन सचिव विनोदकुमार सुमन यांनी सांगितले. दुपारपासून कोसळणारा पाऊस संध्याकाळपर्यंत कायम राहिल्याने बचावकार्यात अडथळे येत होते. दुर्घटनेची माहिती मिळताच जवळच्या हर्शिल गावातील लष्कराचे पथक त्वरित घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी मदत व बचावकार्य सुरू केले. मात्र, खराब हवामान आणि विस्कळित रस्त्यांमुळे इतर ठिकाणांहून येणाऱ्या पथकांना घटनास्थळी पोहोचणे कठीण झाले, अशी माहिती सुमन यांनी दिली. इंडो-तिबेट सीमा पोलिसांचे (आयटीबीपी) १६ जवानांचे एक पथक मातली येथून धराली येथे पोहोचले आहे. आयटीबीपीच्या अन्य युनिटनाही घटनास्थळी दाखल होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) पथक मात्र संध्याकाळपर्यंत घटनास्थळी पोहोचू शकले नव्हते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, ऋषीकेश येथील एम्स रुग्णालयात खाटा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. तर, घटनास्थळी रुग्णवाहिका रवाना करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी आपला आंध्र प्रदेश दौरा रद्द केला असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून ते परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहेत.

**चहुबाजूंनी कोंडी...**

ढगफुटीमुळे धरालीची चहुबाजूंनी कोंडी झाली आहे. मातीचे ढिगारे चिखल आणि पाण्यामुळे धरालीला जोडणारे व इतरत्रचे १६३ रस्ते बंद झाले आहेत. यामध्ये पाच राष्ट्रीय महामार्ग व सात राज्य महामार्गांचा समावेश आहे. याशिवाय उत्तराखंडच्या सीमेवरील दोन मार्गही रोखून धरण्यात आल्याने नागरिकांच्या संचारावर मर्यादा आल्या आहेत.

**भयकारी व्हिडीओ...**

उत्तराखंडमधील ढगफुटीचे वृत्त हाती आल्यानंतर काही क्षणांतच या घटनेचे भयकारी व्हिडीओही व्हायरल झाले. यावरूनच या ढगफुटीचे भीषण चित्र जगासमोर आले. नदीने आपली रेषा ओलांडल्याने चिखलाने भरलेले पाण्याचे लोट डोंगरावरून अतिवेगाने खाली पडत असून, रहिवासी ठिकाणांवर कोसळत असल्याचा व्हिडीओ सर्वप्रथम समोर आला. या लोटामुळे तीन-चार मजली हॉटेले, घरे पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळत असल्याचे दिसत होते. सोबत गोंधळ व रहिवाशांचा भयकंपित किंकाळ्या ऐकू येत आहेत. 'सर्व संपले' असे म्हणत एक व्यक्ती गाळमिश्रित पाण्यातून मार्ग काढताना दिसत आहे. आणखी एका व्हिडीओमध्ये एक व्यक्ती धरालीतील आपल्या नातेवाईकांना दूरध्वनी करण्याचा अगतिक प्रयत्न करीत असल्याचे दिसत आहे.

**अस्थिर हिमालय...**

ढगफुटीमुळे हिमालयाच्या भारताच्या बाजूच्या भागांत गेल्या काही वर्षांत भीषण आपत्ती ओढवत आहे. कमी काळात कोसळणारा महाभयंकर पावसामुळेच या भागात भूस्खलनाचे व दरड कोसळण्याचे प्रकार घडत आहेत. एका तासात वादळवाऱ्यासह व विजांच्या कडकडाटासह १ हजार मिमीहून अधिक पर्जन्यमान झाल्यास तसेच यामुळे २०-३० चौ. किमी क्षेत्र बाधित झाल्यास त्यास ढगफुटी संबोधले जाते. १ हजार ते २ हजार मीटर उंचीवरील भागात हा धोका अधिक भेडसावत आहे. उत्तरकाशी हे समुद्रसपाटीपासून ११६० मीटर अंतरावर असल्याने या भागही नैसर्गिकदृष्ट्या धोकादायकच गणला जातो.

**धोक्याच्या शिट्या व्यर्थच...**

महापुरामध्ये बेपत्ता झालेल्यांची नेमकी संख्या समजू शकली नसली, तरी अचानक आलेल्या महापुरामुळे लोकांना सुरक्षितस्थळी जाण्यास वेळच मिळाला नाही. डोंगरावरील उंच भागावरील गावातून धराली बाजारातील लोकांना सावध करण्यासाठी शिट्या वाजवण्यात आल्या व धोक्याची कल्पना देण्यात आली, मात्र, पाण्याच्या लोंढ्याचा वेग प्रचंड होता. त्यामुळे घराबाहेर पळालेल्या गावकऱ्यांना काही क्षणांतच या पाण्याने गिळंकृत केले. महापुराचा फटका ४० ते ५० इमारतींना बसल्याचे उत्तराखंडचे प्रधान सचिव आर. के. सुधांशू यांनी सांगितले. खराब हवामानामुळे मदतकार्यासाठी हेलिकॉप्टरची मदत घेता येत नसल्याचेही त्यांनी सांगितले. हर्शिल येथील लष्करी तळालाही पुराचा फटका बसला असून, आठ ते दहा जवान बेपत्ता असल्याचे समजते.

## वृद्ध होमिओपॅथिक डॉक्टरने पत्नीसमवेत आयुष्य संपवले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नागपूर :** नागपूर शहरातील सोनेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या समर्थ नगरी परिसरात बुधवारी एक अत्यंत हृदयद्रावक घटना घडली आहे. एका ८० वर्षीय निवृत्त होमिओपॅथिक डॉक्टरने आपल्या ७० वर्षीय पत्नीसमवेत दीर्घ आजाराला कंटाळून विष प्राशन केल्याची घटना समोर आली आहे. यात डॉक्टरांचा मृत्यू झाला असून, त्यांची पत्नी सध्या गंभीर आहे, त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

ही घटना समर्थ नगरी येथील प्लॉट क्रमांक १०४ मध्ये घडली आहे. मृत डॉक्टरांचे नाव गंगाधर बालाजी हरणे (वय ८०) असे आहे, ते दीर्घकाळापासून होमिओपॅथी व्यवसायात कार्यरत होते. त्यांची पत्नी निर्मला हरणे (वय ७०) या देखील आजाराने त्रस्त होत्या. वृत्तानुसार, गंगाधर हरणे यांना पोटाचे गंभीर विकार आणि दातांचे आजार होते. त्यांच्या या व्याधींवर उपचार सुरू होते, मात्र सततचा शारीरिक त्रास आणि वाढत्या वयामुळे त्यांच्यावर मानसिक ताण आला होता. अखेर या त्रासाला कंटाळून त्यांनी पत्नीसमवेत बुधवारी सकाळी विष घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.

घटनेच्या वेळेस हे दाम्पत्य घरी एकटेच होते. त्यांची मुलगी एका खासगी शाळेत शिक्षिका असून, लग्न झाल्यानंतर वेगळे राहत होती. तर मुलगा झारखंडमधील एका स्टील प्लांटमध्ये कार्यरत आहे. त्यामुळे हरणे दाम्पत्य एकटेच समर्थ नगरीतील घरात राहत होते.

बुधवारी शेजाऱ्यांनी दोघांनाही घराच्या पॅसेजमध्ये बेशुद्धावस्थेत पहिले. त्यांनी तत्काळ त्यांच्या मुलीला आणि पोलिसांना याची माहिती दिली. मुलगी तातडीने घरी पोहोचली आणि तिने दोघांनाही अंबाझरी परिसरातील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासणीदरम्यान गंगाधर हरणे यांना मृत घोषित केले, तर निर्मला हरणे यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता त्यांना विषाची बाटली आणि एक सुसाईड नोट आढळून आली. या चिठ्ठीत त्यांनी त्यांच्या निर्णयासाठी कोणालाही जबाबदार धरू नये, असे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे ही आत्महत्या असल्याची प्राथमिक शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. सध्या सोनेगाव पोलीस अधिक तपास करत आहेत.

या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. वृद्ध अवस्थेत आजाराने त्रस्त झालेल्या दाम्पत्याने असा टोकाचा निर्णय घेतल्याने समाजात एक गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. वृद्ध आणि आजारी लोकांना आधार देणारे सामाजिक आणि कौटुंबिक यंत्रणा किती सक्षम आहेत? असा प्रश्न निर्माण होत आहे. तर सध्या सोनेगाव पोलिसांचा तपास सुरू असून, सुसाईड नोटची सत्यता, घरातील परिस्थिती, आणि नातेवाईकांची चौकशी या अनुषंगाने पुढील कारवाई केली जात आहे. या घटनेमुळे नागपूरकरांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

## उत्तराखंडमधील ढगफुटी; महाराष्ट्रातील ५१ पर्यटक सुरक्षित



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०६, ठाणे :** उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात मुसळधार पाऊस व ढगफुटी झाली. या घटनेमुळे खीरगंगा नदीला मोठा पूर आला व अनेक घरांचे नुकसान झाले आहे. दरम्यान उत्तराखंडमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पर्यटक उत्तरकाशीमध्ये अडकले होते. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील ११ व इतर जिल्ह्यांतील ४० अशा ५१ पर्यटकांचा समावेश असून हे सर्व पर्यटक सुखरूप असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली. उत्तराखंड मध्ये अडकलेल्या पर्यटकांना आवश्यक मदत करण्यासाठी महाराष्ट्र शासन तत्पर असून पर्यटकांची संपर्क करत आहे. यासाठी राज्य शासनामार्फत उत्तराखंड आपत्ती व्यवस्थापन केंद्र व उत्तरकाशी जिल्हा आपत्ती केंद्राशी संपर्क साधला जात असून अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी महाराष्ट्र सदन, दिल्ली यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. आवश्यकतेनुसार राज्यातील जिल्हा प्रशासनाला सूचनाही देण्यात आल्या आहेत. येथील परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून पुढील सूचना वेळोवेळी दिल्या जाणार असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळवले आहे.

**संपर्क क्रमांक :**

राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, महाराष्ट्र :
९३२१५८७१४३ / ०२२-२२०२७९९० / ०२२-२२७९४२२९
राज्य आपत्कालीन कार्य केंद्र, उत्तराखंड :
०१३५-२७१०३३४ / ८२१०००००

## सण, उत्सव शांततेत पार पाडणे ही आपली सामूहिक जबाबदारी : प्रभारी जिल्हाधिकारी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** आगामी काळात जिल्ह्यात गणेशोत्सव, श्रीकृष्ण जन्माष्टमी, दहिहांडी, पोळा, ईद - ए- मिलाद असे सर्वधर्मीय सण, उत्सव साजरे होणार आहे. हे सर्व उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाला सर्वांनी सहकार्य करावे. ही आपली सर्वांचीच सामुहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांनी केले. नियोजन सभागृह येथे जिल्हा प्रशासन व पोलिस विभागाच्या वतीने आयोजित जिल्हा शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी अपर पोलिस अधिक्षक ईश्वर कातकडे, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिक्षक नितीन धार्मिक यांच्यासह, उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलिस निरीक्षक, पोलिस पाटील, शांतता समितीचे सदस्य, महिला दक्षता समितीचे सदस्य, गणेश मंडळाचे अध्यक्ष, मुर्तीकार, डीजे चालक मालक आदी उपस्थित होते. शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सवाचा' दर्जा दिला आहे, असे सांगून डॉ. व्यवहारे म्हणाले, उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धेत चंद्रपूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त गणेश मंडळांनी सहभाग नोंदवून बक्षीसे मिळवावीत. गणेश मुर्तींच्या विसर्जनासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी घाट निश्चित करून विसर्जनस्थळी पूर्ण व्यवस्था करावी. आरोग्य विभागाने प्रथमोपचार व्यवस्था, औषधांची उपलब्धता चोख ठेवावी. प्रादेशिक परिवहन विभागाने मिरवणुकीदरम्यान वाहतूक व्यवस्थेकडे लक्ष द्यावे. गणेशोत्सवात वीज पुरवठा खंडीत होणार नाही, तसेच मंडळांना वीज जोडणी महावितरण कंपनीने उपलब्ध करून द्यावी. सार्वजनिक बांधकाम विभागाने खड्डे असलेल्या रस्त्यांची डागडुजी करावी. अन्न व औषध प्रशासन विभागाने मिठाई, अन्न पदार्थांची तपासणी करावी, अशा सुचना प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. व्यवहारे यांनी दिल्या.

डीजे मुक्त गणेशोत्सवसाठी मंडळांनी पुढाकार घ्यावा अपर पोलिस अधिक्षक कातकडे प्रशासन म्हणजे केवळ शासकीय विभागच नव्हे तर आपण सर्वजण म्हणजे प्रशासन होय. त्यामुळे जिल्हा प्रशासनाला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धेमध्ये सहभागी होऊन पर्यावरणपुरक गणेशोत्सव, रक्तदान शिबीर, प्लॅस्टिक निर्मुलन, वृक्षारोपण, गरीब शालेय विद्यार्थ्यांना वह्या पुस्तकांचे वाटप असे सामाजिक उपक्रम राबवून गणेशोत्सव साजरा करावा. तसेच डीजे मुक्त गणेशोत्सवासाठी मंडळांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन अपर पोलिस अधिक्षक ईश्वर कातकडे यांनी केले. पुढे ते म्हणाले, डीजे ऐवजी लेझीम नृत्य, ढोल ताशे असे पारंपरिक वाद्ये वाजवावीत. गणेश मंडळांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून जास्तीत जास्त भक्तांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करावा, जेणेकरून गर्दीला आळा घालता येईल. तसेच प्रशासनाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. अफवांवर विश्वास ठेवू नका, अफवा लक्षात येताच तात्काळ पोलिसांशी संपर्क करा, असे त्यांनी सांगितले. शांतता समिती सदस्यांच्या सुचना : - सण उत्सवाच्या दरम्यान विद्युत पुरवठा अखंडीत सुरू राहावा, डीजे चा आवाज मर्यादीत असावा, मिरवणुकीसाठी रस्त्यांची तात्काळ डागडुजी करावी, मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा, अफवा पसरणार नाही, याची दक्षता घ्यावी, मुर्तीची उंची मर्यादेपेक्षा जास्त असू नये, मिरवणुकीदरम्यान जिल्हा सामान्य रुग्णालयासमोर ध्वनीक्षेपक बंद ठेवावे, मुर्ती विक्री चांदा क्लब ग्राऊंडवरच व्हावी, लेझर लाईटवर बंदी आणावी, सजावटीमध्ये प्लॅस्टिक, थर्माकॉलच्या वापरावर प्रतिबंध करावे.

## सुपरवायझरला निर्घृणपणे संपवलं; हातपाय बांधून विहिरीत फेकले

**दि.०६, बुलढाणा :** खामगाव एमआयडीसीमधील हरेकृष्ण इंडस्ट्रीजमध्ये कार्यरत सुपरवायझरची हातपाय बांधून विहिरीत फेकून हत्या करण्यात आली. ही घटना मलकापूर तालुक्यातील धानोरा शिवारात मंगळवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. चार दिवसांपूर्वी पर्यवेक्षक बेपत्ता झाला होता.

**नेमकं काय घडलं?**

घनश्याम रमेश भुतडा (४८) असे हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. खामगाव एमआयडीसीत हरेकृष्ण इंडस्ट्रीजमध्ये भुतडा सुपरवायझर म्हणून काम करीत होते. मलकापूर तालुक्यातील धानोरा शिवारात संजय पाटील यांच्या राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या शेतातील विहिरीत भुतडांचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी पंचनामा करून त्यांचा मृतदेह बाहेर काढला. यावेळी त्यांचे हातपाय बांधलेल्या अवस्थेत आढळले. यावरून त्यांची हत्या झाल्याचे स्पष्ट झाले. अज्ञात आरोपींनी खून करून पुरावा नष्ट करण्यासाठी त्यांना विहिरीत फेकले. याप्रकरणी नातेवाइक रवींद्र सुभाष भुतडा (रा. वरूड, ता. मोताळा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मलकापूर ग्रामीण पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध हत्येचा गुन्हा नोंदविला.

**बेपत्ताची तक्रार!**

घनश्याम भुतडा यांच्या मुलाची शेगाव येथील एका कॉलेजमध्ये प्रवेशाकरिता निवड झाली आहे . प्रवेशाच्या चौकशीसाठी सुटाळा येथील एका शिक्षकाकडे जातो म्हणून ते २ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजतापासून घराबाहेर पडले होते . तेव्हापासून ते बेपत्ता झाल्याची तक्रार कुटुंबीयांनी पोलिसांत दिली होती. त्यांचा शोध घेत असतानाच मलकापूर तालुक्यात मृतदेह आढळला.

## संपादकीय



### दुरावा साधणारे दुर्मीळ चुंबक

चीनने सध्या तेच चालविले असून दुर्मीळ खनिजांपासून तयार होणाऱ्या चुंबकावर व्यापार–उदिमात इतर राष्ट्रांची प्रगती ते रोखत आहेत. विजेवर चालणाऱ्या मोटारींच्या बॅटरीची मदार या दुर्मीळ खनिजांपासून तयार होणाऱ्या चुंबकावर आहे. संख्येमध्ये किंवा वजनामध्ये त्यांचे प्रमाण खूप मोठे नाही, परंतु ते म्हणजे या ईव्ही मोटारींचे हृदय आहे. त्यामुळे बसगाड्यांपासून मोटारी–दुचाक्यांपर्यंतच्या उत्पादनास खीळ तर बसू शकतेच; त्याचबरोबर सामरिक उपयोगाच्या इतरही अनेक साधनांची उत्पादन साखळी कोलमडण्याचा धोका असतो.

रसायनांच्या सारिणीतील १७ रसायन मूलद्रव्यांच्या समूहात ही दुर्मीळ खनिजे मोडतात. गॅडोलिनिमिअम, निओडायमिअम, सेरिअम, डिस्पोजिअम, प्रॅसिओडायमिअम, युरोपिअम, टर्बिअम, वायट्रीअम अशी मूलद्रव्यांची कठीण नावे आहेत. यातल्या एकेक घटकाचे आधुनिक युगातील साधनांच्या निर्मितीत मोलाचे स्थान आहे. विजेवरच्या वाहनांमधील मोटर्स, ड्रोन्स, क्षेपणास्त्रे, रडार, पवनऊर्जेची मोटर, जेट इंजिनांची कार्यक्षमता वृद्धी, तरुणांच्या कानांत दिसणारी श्रवणयंत्रे, एलईडी, कॅमेऱ्याच्या लेन्स, वैद्यकीय वापरातील मोजमापाची उपकरणे अशा विविध साधनांचा ही खनिजे म्हणजे कणा आहे. दुर्मीळ खनिजांपासून तयार होणारे चुंबक हे ऊर्जाबचत तर करतातच, शिवाय वजन व आकार यातही सरस असतात. काही महिन्यांपूर्वी सेमीकंडक्टर निर्मितीवरून बरेच वादळ उठले होते.

भारतात काही वर्षांपूर्वी पंजाबात एक सेमीकंडक्टरचा प्रकल्प आला होता, मात्र त्यात आग लागल्यावर पुढे काही त्यावर झाले नाही, याबद्दल वाहन उद्योगातील तंत्रज्ञाने खंत व्यक्त केली. अजून पुढची दहाएक वर्षे तरी भारताकडे ठोस तोडगा दृष्टिपथात नाही. जपानने पर्याय शोधून आपले चीनवरचे अवलंबित्त्व कमी केल्याचे सांगितले जाते. भारताने आता अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरात समुद्रतळाशी खनिजांचे उत्खनन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या समुद्री कायदा मंचापुढे (अन्क्लॉस) परवानगी मागितली आहे. दोन वर्षांपूर्वी सतलजच्या खोऱ्यात टॅन्टॅलम या दुर्मीळ धातूचा स्रोत सापडला आहे.

यावरून, १५–२० वर्षांपूर्वी लोह खनिजांसाठी गोवा व पश्चिम घाटामध्ये बेसुमार उत्खनन सुरू होते, तेव्हाची आठवण झाली. त्या वेळी न्या. एम. बी. शाह यांच्या नेतृत्त्वाखाली एक समिती नेण्यात आली होती. लोह खनिजाची ५० वर्षांची गरज लक्षात घेऊन त्यानुसार आपण नियोजन व संवर्धन करण्याची आवश्यकता आहे, अशी शिफारस त्यांनी केली होती. आपल्या देशातील पायाभूत सुविधा उभारणीसाठी चीन मोठ्या प्रमाणात लोह खनिज खरेदी करत सुटला होता. यावरूनच आता खरा महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो.

नैसर्गिक साधनस्रोतांचे दूरगामी व्यवस्थापन आपण किती काटेकोरपणे करतो आहोत, हा तो प्रश्न. एके काळी क्रूड तेलाभोवतीच जगातील भूराजकीय डावपेच फिरत होते. अमेरिकेने छेडलेली युद्धे हा त्याचाच परिपाक. आत्ताही अमेरिकेने आयातशुल्काच्या रूपाने व्यापारयुद्ध छेडले आहे. तर चीन हा खनिजे आपल्याकडे राखून उद्योगाच्या पुरवठा साखळीला छेद देऊ पाहत आहे. हे सर्व आपल्याला आधी सुचले नव्हते का, हा प्रश्न मनात येऊ शकतो. परंतु प्रत्येक देशाची जडणघडण व जनतेचा उदरनिर्वाह, लोकजीवन, नैसर्गिक अन्नसाखळी, या सर्वांशी हा प्रश्न निगडित असतो.

खनिज सापडले म्हणून वसुंधरेवर अत्याचार करून लोकांचे विस्थापन आपण करू शकत नाही. वन्यजीव, सजीवसृष्टी, जंगल आच्छादन यावर बेसुमार कुऱ्हाड चालवू शकत नाही. समुद्रतळ कितीही पोखरले, तरी त्याचा जलजीवनावर किती परिणाम होईल, त्याचेही मोजमाप आवश्यक ठरते. वाहन क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणतात, त्यानुसार भविष्यकाळातील मोटार इंधन हे हायड्रोजन असेल, तर हे सगळे आडाखे बदलूही शकतात. या दूरदृष्टीनुसार नैसर्गिक साधनस्रोतांचे व्यवस्थापन नितांत गरजेचे आहे.

## पुस्तके म्हणजे सुगंधी फुले

अनेक दर्जेदार पुस्तकांचे वाचन केल्यामुळे माझ्या मनाच्या कक्षा रुंदावत गेल्या.पुस्तकांचा सहवास, पुस्तकांचा गंध आणि पुस्तकांशी केलेली मैत्री मला गरजेपेक्षा जास्त लाभदायक ठरली.अनेक नामांकित व सुप्रसिद्ध लेखकांचे कथासंग्रह, अद्वितीय अशा कादंबऱ्या,सुरस आणि सरस कवितासंग्रह,तेजोमय व लखलखीत आत्मचरित्रे,रंजक आणि खुमासदार व्यक्तीरेखा, अनेक प्रवासवर्णने,महामानवांची चरित्रे हे सगळे वाचताना मी स्वतःला हरवून बसलो होतो.ही पुस्तके वाचताना मला अनेक सुगंधी फुले सापडली.ही फुले म्हणजे मला आवडलेली माणसं, त्यांचे स्वभाव,त्यांचे वर्तन आणि त्यांची जीवन जगण्याची वृत्ती.

अण्णा भाऊ साठे,शंकरराव खरात, विश्वास पाटील,वि.स.खांडेकर, साने गुरुजी,शिवाजी सावंत,उत्तम कांबळे,ना. सि.फडके,रणजीत देसाई,व्यंकटेश माडगूळकर,शंकर पाटील,द.मा.मिरासदार,विणा गवाणकर,दया पवार या नामवंत लेखकांची पुस्तके वाचून अनेक व्यक्तींची जीवनशैली,विचार,वर्तन, स्वभाव आणि सवयी यांचा सूक्ष्म अभ्यास झाला. झाडाझडती ही मराठीतील सर्वात मोठी कादंबरी मी तीनवेळा वाचली आहे.ही कादंबरी कितीही वेळा वाचली तरीही मनाचे समाधान होत नाही. पानिपत ही ऐतिहासिक कादंबरी वाचून मन सुन्न झाले होते.फकिरा कादंबरीने मला अण्णा भाऊ साठे यांची




पुस्तके वाचनाचे वेड लावले.

'बुध्द आणि त्याचा धम्म' हे पुस्तक वाचून तथागत गौतम बुद्धांचे जीवन चरित्र कळाले.विणा गवाणकर यांच्या 'एक होता कार्व्हर' या पुस्तकाने अमेरिकेतील सामाजिक परिस्थितीचे वास्तव कळाले.जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर या युगपुरुषाचे सामाजिक व कृषी क्षेत्रातील अलौकिक कार्य थक्क करणारे आहे.

तराळ अंतराळ,बलुतं,उपरा,वाट तुडवताना,उचल्या,आमचा बाप आणि आम्ही,कोल्हाट्याचं पोर, अक्करमाशी,आठवणीतले पक्षी ही आत्मचरित्रे वाचून मला त्या त्या लेखकांचे सामाजिक,शैक्षणिक, राजकीय,धार्मिक,सांस्कृतिक जाती विषयक विचार व शापित जीवन पध्दती कळाली.अमृतवेल,रमाई, श्यामची आई,गारंबीचा बापू , भारतीय संस्कृती,दोन मने, ग्रामगीता,ज्ञानयोग ही पुस्तके वाचून जीवनाचे सार्थक झाल्याचे समाधान लाभले.ही पुस्तके वाचताना मला वाचन संस्कृतीचे महत्त्व लक्षात आले.प्रेमचंदचे गोदान,गबन ही पुस्तके वाचून मला हिंदी पुस्तके वाचण्याची आवड निर्माण झाली. अलीकडील काळातील जगदीश ओहोळ यांचे 'जग बदलणारा बाप माणूस', गणेशराव गुळवे यांचे माझा आजन्म कारावास ही पुस्तके मला खूप खूप भावली.ही आणि इतर अनेक पुस्तके वाचून मला माझ्या जीवनाचे सार गवसले.या विविध पुस्तकातील व्यक्ती रेखा मला माझे जीवन सन्मार्गाने जगण्याची शिकवण देतात.पुस्तके वाचता वाचता मी माणसे वाचायला लागलो.विविध तऱ्हेचे माणसे वाचताना मला माणसांचे गुण व दोष चटकन लक्षात येत आहेत.

वाचनानंतर चिंतन झाले,चिंतना नंतर लेखन सुरू आहे.अनेक मराठी दैनिकांत माझे लेख,कविता, कथा,व्यक्ती रेखा प्रकाशित होत आहेत.माझ्या जीवनातील तेजस्वी तारे हे माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाले असून ते अनेक वाचकांना आवडले आहे.

आजकाल पुस्तके वाचनाचा छंद जोपासला जात नाही.मोबाईल, टीव्ही आणि संगणकाच्या सानिध्यात नविन पिढी गुरफटलेली आहे.या वाईट सवयींमुळे वाचन छंद लुप्त झाला आहे.अवांतर वाचन करायचे असते,विविध पुस्तके वाचायची असतात याचा नवीन पिढीला पूर्णपणे विसर पडला आहे.पुस्तके वाचल्याने ज्ञान वृद्धी होते,वेगवेगळ्या क्षेत्राची ओळख होते,मनाच्या कक्षा रुंदावतात,हृदय भावस्पर्शी बनते आणि विविध मान्यवर मंडळींच्या कार्याची माहिती मिळते.म्हणून पुस्तके वाचावीत. वेगवेगळी पुस्तके वाचण्यासाठी वेळ काढावा लागतो.पुस्तके आवडीने व एकाग्रतेने वाचली की मनाची मशागत होते.वाचनाचा पुरेपूर आनंद मिळतो.पुस्तके वाचताना मला अनेक व्यक्ती भेटल्या.त्यांच्या भेटीतून त्यांच्या रुपाने मला सुगंधी फुले सापडली.या सुगंधी फुलांनी माझ्या जीवनाला कलाटणी दिली आहे.पुस्तके वाचण्याचा सुगंध मन मोहून टाकत आहे आणि जीवनात सुखरुपी रंगाची उधळण करत आहेत.

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९७३०९३९७३२**

## यंदाच्या गणेशोत्सवात आनंदाचा शिधा मिळणार नाही

**अक्षराज : संजय पंडीत**

**दि.०६, मुंबई :** लाडकी बहीण योजनेचा फटका आता आनंदाचा शिधा योजनेला बसणार असून यंदाच्या गणेशोत्सवात आनंदाचा शिधा मिळणार नाही. लाडकी बहीण योजनेसाठी ४५ हजार कोटी रुपये द्यावे लागणार असल्याने आनंदाचा शिधा देऊ शकत नाही असं राज्याचे अन्न पुरवठा मंत्री छगन भुजबळ म्हणाले. सणासुदीच्या काळात राज्यातील गरीबांना केवळ १०० रुपयांमध्ये चार वस्तू या योजनेच्या माध्यमातून देण्यात येतात. राज्यातील तिजोरीतील एकदम ४५ हजार कोटी रुपये लाडकी बहीण योजनेसाठी द्यावे लागणार आहेत. त्यामुळे त्याचा परिणाम इतर योजनांवर थोडा थोडा होत असल्याचं छगन भुजबळांनी




कबुल केलं. आम्ही आता राज्य सरकारचं उत्पन्न वाढवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. सध्या योजनांच्या निधी बाबत मागेपुढे होतं असलं तरी आम्ही निधी उपलब्ध होईल तशी योजना चालवत राहू असंही छगन भुजबळ म्हणाले.आनंदाचा शिधा द्यायचा असेल तर त्यासाठी दोन ते तीन महिने आधी टेंडर काढावे लागते. आता तरी हे शक्यत नाही. आनंदाचा शिधा आत्ता मिळणार नाही. टेंडर त्यासाठी काढाव लागतं त्यासाठी दोन तीन महिन्यांचा कालावधी लागतो. आता तरी हे शक्य नाही. वर्षाला शिवभोजन थाळी साठी १४० कोटी रुपये तर आनंदचा शिधा साठी ५५० कोटी रुपये लागत होते.

आनंदाचा शिधा योजनेच्या माध्यमातून सणासुदींच्या निमित्ताने राज्यातील रेशनकार्ड धारकांना फक्त शंभर रुपयात काही जीवनावश्यक वस्तू देण्यात येत होत्या. त्यामध्ये एक किलो साखर, एक किलो रवा, एक किलो चना डाळ, एक लिटर पामतेल देण्यात येत होतं. आता हा शिधा यंदा देण्यात येणार नाही.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना ही योजना सुरू करण्यात आली. २०२२ च्या दिवाळीला पहिल्यांदा 'आनंदाचा शिधा' किटचे वितरण करण्यात आले, ज्यात एक किलो चणा डाळ, साखर आणि एक लिटर खाद्यतेल यांचा समावेश होता. तो लाभार्थ्यांना फक्त १०० रुपयांत वितरित केला जातो. २०२३ मध्ये गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गौरी–गणपती आणि दिवाळी या सणांच्या निमित्ताने, तसेच २०२४ मध्ये अयोध्येतील राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सरकारने 'आनंदाचा शिधा' किटचे वितरण केले होते.

दरम्यान राज्यातील गरीबांसाठी असलेली शिवभोजन थाळीही बंद होण्याच्या मार्गावर आहे. शिवभोजन योजना सुरू ठेवण्यासाठी १४० कोटी रुपयांची गरज आहे. मात्र सरकारकडून अन्न नगरी पुरवठा खात्याला केवळ २० कोटींचा निधी देण्यात आल्याने अडचणी निर्माण झाल्याची सूत्रांची माहिती आहे.

## गुलाम..

वाचाळांची करतात
पक्षा नियुक्ती मुद्दाम
फक्त व्हावे बदनाम
कधी न मिळे छदाम

घाव घाली वर्मावरी
कळवळतो अंतर्याम
घसरतजा वळणावर
अक्षरासतत व्यायाम

शोधता नवीन विषय
मुखाला नाही विराम
जिव्हेची रे घसरगुंडी
शब्दही होतात हराम

सोडूनका कुणालाही
घायाळ करावे तमाम
पद लालसा ना कधी
कार्य करावे निष्काम

मुक्ता फळे उधळावी
कायम बोल बेलगाम
सवड नसे क्षणभरही
निवडणूकीचा हंगाम

निसटून जाई बाकीचे
स्वतांवर घ्या इल्जाम
अटक पूर्व जामिनार्थ
क्वचित करी इंतजाम

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

## दोन राष्ट्रगीतांचे जनक ; गुरुदेव रवींद्रनाथ टागोर




**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

आज ७ ऑगस्ट, भारत मातेचे महान सुपूत्र , चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगितकार गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची पुण्यतिथी. रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी कोलकात्यातील जोर - सांको येथे झाला. त्यांच्या आईचे नाव शारदादेवी तर वडिलांचे नाव महर्षी देवेंद्रनाथ टागोर असे होते.

रवींद्रनाथ टागोरांनी आपले शिक्षण घरीच विविध विषयांच्या खाजगी शिक्षकांच्या हाताखाली घेतले. त्यांनी लहान वयातच कविता लिहायला सुरुवात केली. वयाच्या आठव्या वर्षीच त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपण नावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. बॅरिस्टर होण्याआधी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवी शिवाय ते बंगालमध्ये परतले. १४ नोव्हे १९१३ रोजी गीतांजली या रचनेबददूल स्वीडीश अकादमीचा नोबेल पुरस्कार त्यांना देण्यात आला. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते.

रवींद्रनाथ हे भारताचे व आशियाचे पहिले नोबेल विजेते होत. १९१५ साली त्यांना ब्रिटीश सरकारने सर ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. रवीन्द्रनाथांनी



रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांगलादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे जगातील एकमेव कवी आहेत. पारंपारिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रविंद्रनाथकालीन भारतामध्ये सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक चळवळींचे प्रमुख केन्द्रांपैकी एक असलेल्या महाराष्ट्राचा प्रभाव रवींद्रनाथांवरही पडला होता. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता.

संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांवर त्यांनी एक खंडकाव्यही रचले आहे. शांतीनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होय. रवींद्रनाथ टागोरांना गुरुदेव असे संबोधले जाते, १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी रवींद्रनाथांच्या कार्यामुळे बंगाली साहित्यात व बंगाली संगीतात आमूलाग्र बदल घडून आला.

बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रविंद्रोत्तर अशी विभागणी केली जाते यावरून बंगाली साहित्यावर रवींद्रनाथांच्या प्रभाव लक्षात येतो. एक महान कवी असण्यासोबतच ते एक महान देशभक्त होते त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने भारतीय लोकांना प्रभावित केले. ७ ऑगस्ट १९४१ रोजी रवींद्रनाथ टागोर यांचे निधन झाले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बाजारपेठ पोलीस ठाण्याची उल्लेखनीय कामगिरी


### अवघ्या काही तासांत एटीएम तोडफोड प्रकरणाचा लावला छडा



**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.०६, कल्याण (ठाणे) :** बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या पथकाने अतिशय तत्परतेने आणि कुशलतेने कामगिरी बजावत सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या एटीएम तोडफोड प्रकरणाचा अवघ्या काही तासांत तपास लावून दोन आरोपींना अटक केली आहे. दिनांक ०५ रोजी रात्री अत्रे हॉल, कल्याण (पश्चिम) येथे असलेल्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकेच्या एटीएम मशीनला दोन अज्ञात व्यक्तींनी दगडाच्या साहाय्याने फोडण्याचा प्रयत्न केला. त्यांचा हेतू एटीएममधून पैसे चोरण्याचा होता, मात्र त्यात त्यांना यश आले नाही. तरीसुद्धा या तोडफोडीत एटीएम मशीनचे अंदाजे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले. सदर घटनेची माहिती मिळताच बँकेच्या मॅनेजरच्या फिर्यादीवरून बाजारपेठ पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कलम ३०५, ६२, ३२४(१) अन्वये गुन्हा क्रमांक ४६५/२०२५ नोंदविण्यात आला. या प्रकरणाचा तपास करताना घटनास्थळी लावण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश सिंह गोंड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत आंधळे यांच्या नेतृत्वाखाली एक विशेष तपास पथक तयार करण्यात आले. या पथकात पोलीस हवालदार प्रेम बागुल, रमाकांत पाटील, रवींद्र भालेराव, परमेश्वर बाविस्कर, तसेच पोलीस शिपाई अरुण आंधळे व राहुल ईशी यांचा समावेश होता. या पथकाने घटनेच्या परिसरात प्रभावी गस्त घालत सीसीटीव्ही फुटेजमधील संशयितांना ओळखून त्यांना बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. गिरफ्तार आरोपींची नावे पुढीलप्रमाणे १.मंगेश भीमराव जगताप, वय ३६ वर्ष, व्यवसाय – चालक, रा. बिल्डिंग नं. १६, रूम नं. ७०२, संघर्ष नगर, घाटकोपर पश्चिम, मुंबई. २.नौशाद अहमद अन्सारी, वय २२ वर्ष, व्यवसाय – केटरिंग, रा. फुटपाथ, अहिल्याबाई चौक, कल्याण (पश्चिम). बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या या वेगवान व परिणामकारक कारवाईमुळे स्थानिक नागरिकांमध्ये पोलीस यंत्रणेबाबत अधिक विश्वास निर्माण झाला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही या कामगिरीचे कौतुक केले आहे.

## मिरारोडमधील वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये पहिले लिव्हर ट्रान्सप्लांट युनिट सुरु




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०६, मिरारोड :** मिरा रोड मधील वोक्हार्ट हॉस्पिटलमध्ये (Wockhardt Hospital, Mira Road) पहिल्यांदाच लिव्हर ट्रान्सप्लांट युनिटची स्थापना करण्यात आली असून, ही सुविधा सुरु झाल्यामुळे संपूर्ण मुंबई उपनगर तसेच पालघर व ठाणे जिल्ह्यातील रुग्णांसाठी मोठा दिलासा मिळाला आहे. या युनिट द्वारे यकृताच्या गंभीर आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना प्रत्यारोपणाची सेवा आता मिरारोडमध्येच उपलब्ध होणार आहे. याआधी अनेक रुग्णांना मुंबई शहरातील मोठ्या रुग्णालयांमध्ये जावे लागत होते, परंतु आता ही उच्च तंत्रज्ञानयुक्त सेवा स्थानिक पातळीवर मिळणार आहे. वोक्हार्ट हॉस्पिटलने आधुनिक तंत्रज्ञान, कुशल डॉक्टरांची टीम व सर्व सुविधा एकत्रित करून हे युनिट सुरु केले आहे. रुग्णांना तपासणीपासून प्रत्यारोपण आणि नंतरच्या उपचारांपर्यंत सर्व सेवा एका ठिकाणी मिळणार आहेत.

हॉस्पिटल प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, हे युनिट आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा प्रदान करणार असून, गरीब आणि गरजू रुग्णांसाठीही उपचार शक्य व्हावेत यासाठी विशेष योजना राबवण्यात येणार आहेत. ही सेवा सुरु झाल्याने मिरारोड आणि आसपासच्या लाखो रहिवाशांना वेळेत उपचार मिळण्यास मदत होणार आहे. तसेच अनेकांचे प्राण वाचवण्याची शक्यता वाढली आहे. सदर कार्यक्रमामध्ये धर्मगुरूंनी अंग दानाचे महत्व सांगितले. धर्मात अनेक प्रकार चे दान असतात त्यात अवयव दान हे महादान आहे. आपल्या मृत्युच्या नंतर आपण अवयवाच्या रूपाने हया जगात राहू । कार्यक्रमात वोक हार्डचे लिव्हर किडनी ट्रान्सप्लांट कसे ट्रान्सप्लांट होते. याची माहिती दिली. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हॉस्पिटल पी.आर.हेड उमेश कळमकर यांनी केले.

## किनवट शहरात खुलेआम मटका जुगार सुरू; पोलीस प्रशासनाचे डोळेझाक

**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०६, किनवट (नांदेड) :** किनवट शहरात दिवसाढवळ्या खुलेआम मटका जुगार सुरू असून पोलीस प्रशासन मात्र कुंभकर्णाच्या झोपेत आहे. गोरगरीब व तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात या विळख्यात अडकत चालला आहे. या जुगारावर अंकुश ठेवण्याऐवजी पोलीस प्रशासन मात्र कुंभकर्णाच्या झोपेत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस प्रशासन ज्या ठिकाणी हफ्ता पोहोचत नाही. अशा ठिकाणी तात्काळ हातभट्टीवर कारवाई करते. मात्र, मटक्याच्या अड्ड्यांना कोणताही अडथळा नाही. त्यामुळे सामान्य जनतेमध्ये पोलीस प्रशासनाबाबत तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. गोरगरीब जनतेला भरकटवणाऱ्या या मटका जुगारावर त्वरित बंदी घालून संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा ही नागरिकांनी दिला आहे.

## श्रीमंत छ.अभयसिंहराजे भोसले विद्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०६, सातारा :** समर्थ एजुकेशन सोसायटी सोनवडी – गजवडी संचलित श्रीमंत छ.अभयसिंहराजे भोसले विद्यालय व ज्युनिअर कॉलेज सोनवडी गजवडी विद्यालयातील ३०० विद्यार्थ्यांना प्रत्येकी ६ वह्या एकुण सुमारे २ हजार वहया वाटप श्री समर्थ सेवा मंडळ सज्जनगड यांनी केले.

यावेळी मंडळाचे कार्यवाहक समर्थ भक्त योगेश बुवा रामदासी मंडळाचे विश्वस्त राजाभाऊ कुलकर्णी, विद्याधर वैशंपायन, अक्षय कुलकर्णी, महादेव किर्दत, परळीचे सरपंच बाळासो जाधव, गजानन बोबडे उपस्थित होते. विद्यालयाचे प्राचार्य मोरे यांनी सर्वांचे स्वागत केले व खामकर व सुतार यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले व आभार मानले. यावेळी कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिमायतनगर नगरपंचायतीचा पुढील नगराध्यक्ष कोण?





**अक्षराज : लक्ष्मण शेन्नेवाड**

**दि.०६, हिमायतनगर (नांदेड) :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची तारीख राज्य निवडणूक आयोगाने जाहीर करताच नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक असणाऱ्यांनी पक्ष श्रेष्ठीकडे मनधरणी करण्यास सुरुवात केली. मागील ६ वर्षांपासून येथील नगर पंचायतीस प्रशासक लागू असल्या कारणाने सर्व स्थानिक कार्यकर्त्यांनी नगरपंचायत निवडणुकीपासून अलिप्त राहावे लागले. पण सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने तारखा घोषित केल्याने नगराध्यक्ष पदासाठी इच्छुकांनी आपल्या पक्षाच्या श्रेष्ठीकडे मनोधारणा करण्यास सुरुवात करण्याचे दिसुन येत आहे हिमायतनगर तालुक्यात तिनच पक्षाचा प्रभाव आहे. काँग्रेस, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस, परंतु येथे शिवसेनेचे दोन गट तयार झाले आहेत.

उ.बा.ठा. पक्षाचा गट व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पक्षाचा गट उ.बा.ठा पक्षाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर आहेत. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पक्षाचे बाबुराव कदम कोहळीकर हे आमदार असताना माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांचा हा बाल्लेकिल्ला आहे. त्यामुळे इच्छुकांची संख्या काँग्रेस पक्षाकडे जास्त आहे. इच्छुकांमध्ये येथील नगर पंचायतीचे प्रथम नगराध्यक्ष अ. अखिल अ. हमीद यांनी तालुक्यात विकास कामे करुन जनसंपर्क वाढवून त्यांनी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी जनसंपर्क कार्यालयाची सुरूवात केली. त्यामुळे ते माधवराव पाटलाचे अत्यंत निकटवर्ती बनले असल्याने त्यांना उमेदवारी मिळू शकते. त्यानंतर माजी नगरसेवक ज्ञानेश्वर शिंदे ह्यांनी सुद्धा मागील सरपंच पदाच्या कार्यकाळात अनेक विकास कामे करून त्यांनी जनतेचे मन जिंकली ते सुद्धा माधवराव पाटील यांच्या अगदी निकटवर्ती आहेत. त्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रफिक सेठ, माजी जिल्हा परिषद सदस्य सम्मद खॉन, डॉ. राजेंद्र वानखेडे हे सुद्धा रिंगणात असल्याचे दिसून येत आहे. तर उ.बा.ठा गटाकडून माजी नगराध्यक्ष कुणाल राठोड, बाळु अण्णा चवरे, विठ्ठल ठाकरे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाकडून माजी नगरसेवक राम ठाकरे, विकास पाटील देवसरकर, आमदार कोहळीकर यांचे खंदे समर्थक गजानन हरडपकर हे इच्छुक आहेत. तर राष्ट्रवादी शरद पवार पक्ष गटातून जनसामन्याशी सलग्न असणारे सेवा सोसायटीचे संचालक उदय देशपांडे व माजी नगरसेवक सरदारखॉ खलिलखॉ म. जावीद अ. गणणी हे इच्छुक असल्याचे दिसून येत आहे. गेल्या नगर पंचायती निवडणुकीत भाजप पक्ष रिंगणात नव्हता पण यावेळी पक्षाची कार्यकारणी भक्कम बांधणी केल्यामुळे व राज्यात पक्षाचा मुख्यमंत्री असल्यामुळे भाजपा यावेळी निवडणूक रिंगणात उतरेल भाजपाकडुन जिल्हा सरचिटणीस गजानन तुप्तेवार, आशिष सकवान तालुका अध्यक्ष गजानन चायल, रामभाऊ सुर्यवंशी तर राष्ट्रवादी अजितदादा पवार यांचे निकटवर्तीय पक्षाचे तालुका अध्यक्ष अभिषेक लुटे हे इच्छुक असल्याचे दिसून येत आहे. उमेदवारी मिळाल्यावर सुद्धा जनताच ठरवणार नगराध्यक्ष कोण ? ते हिमायतनगर तालुका हा माजी आमदार माधवराव पाटील यांचा बाल्लेकिल्ला असल्याने येथे काँग्रेस पक्षाच नगराध्यक्ष होण्याची दाट शक्यता आहे.

## प्रवीण मेंगशेट्टी यांना उत्कृष्ट उपविभागीय अधिकारी; देऊळगावकर यांना उत्कृष्ट तहसीलदार पुरस्कार



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०६, नांदेड :** महसूल दिनानिमित्त प्रशासकीय क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल उपविभागीय अधिकारी भोकर प्रवीण मेंगशेट्टी यांना उत्कृष्ट उपविभागीय अधिकारी व मुदखेडचे तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना उत्कृष्ट तहसीलदार पुरस्कार बुधवार, दिनांक ०६ ऑगस्ट २०२५ रोजी नांदेड येथील एका विशेष समारंभात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे हस्ते शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात प्रदान करण्यात आला.

मुदखेडचे तहसीलदार म्हणून आनंद देऊळगावकर यांनी उमरखेड येथून ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुदखेड येथे पदभार स्वीकारला त्यांच्या काळात विविध शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे नागरिकांच्या समस्यांचे जलद निराकरण करणे सोबतच शासकीय कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण प्रयत्न केले. त्यांनी मुदखेड तालुक्यात शासनाच्या १०० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत सातबारा वरील नावात दुरुस्तीसाठी विशेष मोहीम हाती घेतली होती. या अंतर्गत मुदखेड तालुक्यातील जवळपास ६५० च्या वर सातबारा वरील नावात दुरुस्ती करून सर्व गावांचे रेकॉर्ड अपडेट करून गावांचे ४ डिक्लेरेशन करण्यात आले. ई कार्यालयातून फाईल जनरेट करुन त्याद्वारेच कामकाज करण्यात सर्वाधिक फाईल या नांदेड जिल्ह्यातून सर्वात जास्त होत्या असे करणारा मुदखेड तालुका हा नांदेड जिल्ह्यातून १६ तालुक्यांतून पहिला ठरला असल्यामुळे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी व मुदखेड तहसीलदार आनंद देऊळगावकर यांचे नाव उत्कृष्ट तहसीलदार म्हणून पुरस्कारासाठी जाहीर करण्यात आले व नांदेड येथील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात विशेष कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी व तहसीलदार आनंद देऊळगावकर मुदखेड यांना हा पुरस्कार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, पि.एस.बोरगांवकर, अनन्या रेड्डी, मेघना कावली, किरण अंबेकर महेशकुमार डोईफोडे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## संत ज्ञानेश्वर मुकबधिर विद्यालयातील मुलींनी बनवल्या बियांपासून सुबक राख्या



**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०६, कळंब (धाराशिव) :** श्रावण महिन्यातील राखी पौर्णिमा सण जवळ आल्याने मुकबधिर मुलींनी पर्यावरण पूरक राख्या बनवण्यासाठी सुरुवात केली. तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगाव ता. कळंब संचलित संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मूकबधिर विद्यालय ता.कळंब, जि.धाराशिव येथील चौथी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. विद्यार्थिनींमध्ये पर्यावरण प्रेम व स्वावलंबनाचे मूल्य रुजवण्यासाठी व त्यांच्यातील सृजनशीलता, कल्पकतेला चालना मिळावी.

यासाठी राख्या बनवण्याचा उपक्रम शाळेमध्ये घेण्यात आला. मुलांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा या उद्देशाने मुलींना विविध प्रकारच्या राख्या बनवण्यास मुकबधिर मुलींना प्रशिक्षण देऊन त्यांना साहित्य उपलब्ध करून दिले व त्यांनी आपल्या मूकबधिर भावांसाठी सुंदर अशा बियांपासून व विविध प्रकारच्या राख्या बनवलेल्या आहेत. बियांपासून राखी बनवण्याचा मुख्य उद्देश म्हणजे हातात बांधलेल्या राखीतील बिया इतरत्र पडून त्या ठिकाणी नवीन वृक्ष निर्माण व्हावे व वृक्ष लागवड व्हावी. यासाठी बियांपासून राख्या निर्माण केलेल्या आहेत.

भावा बहिणीचं प्रेमाचं नातं कायम राहावं यासाठी मुकबधिर मुलींनी स्वतः च्या हाताने विविध प्रकारच्या राख्या साकारल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी असे विविध उपक्रम शाळा नेहमी घेत असते.

रेशमाची राखी भावाच्या हातात बांधण्यासाठी स्वतःची कलाकुसर वापरून रक्षाबंधनासाठी सुंदर अशा विविध डिझाईनच्या मोत्यापासून, बियांपासून, मातीपासून तसेच अनेक प्रकारच्या राख्या त्यांनी बनवलेले आहेत.

या राख्यांसाठी परिसरातील नागरिकांचा प्रत्येक वर्षी चांगला प्रतिसाद मिळत असतो. याचाच विचार करून याही वर्षी ज्या मुलींना ऐकता येत नाही व बोलता येत नाही अशा कर्णबधिर मुलींनी आपल्या परिसरातील भावांसाठी सुबक राख्या बनवलेल्या आहेत. यातून मुलांना स्वतः चा पूरक व्यवसाय करता यावा व आर्थिक व्यवहार त्यांना कळवा यासाठी असे उपक्रम तुळजाई प्रतिष्ठानचे सचिव शहाजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मुकबधिर विद्यालयात असे प्रत्येक सणाला नवनवीन उपक्रम सतत सुरू असतात.

त्यातीलच एक भाग म्हणून राखी पौर्णिमेनिमित्त सर्व आपल्या भावांना बांधण्यासाठी खूप छान अशा राख्या मुलींनी बनवलेले आहेत. या राख्या बनवण्यासाठी मूकबधिर शाळेतील विशेष शिक्षिका सुनंदा गायकवाड व सुनिता गुंड यांनी या मुलींना मार्गदर्शन केलेले व त्यांच्यासाठी कच्चा माल उपलब्ध करून देण्याचे महत्वाचे काम शाळेचे मुख्याध्यापक बालाजी जाधवरयांनी केलेले आहे. शाळेतील सर्व मुलींनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला.

# कोळसा खाण क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या नुकसानीचा मोबदला देण्यासाठी शासनाचा मोठा निर्णय

## आ.मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला मोठे यश; नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी समिती स्थापन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड कंपनीच्या कोळसा उत्खननामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे आणि आर्थिक नुकसान झाल्याची गंभीर दखल घेत शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. नुकसानीच्या पंचनाम्यांसह योग्य तो न्याय देण्यासाठी अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात आली असून, ती नुकसान भरपाई संदर्भातील सुधारित धोरण निश्चित करणार आहे.

हा निर्णय राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या सखोल पाठपुराव्याला मिळालेलं फलित ठरले असून या माध्यमातून चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या न्यायहक्काला हक्काचं व्यासपीठ प्राप्त झालं आहे. वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेडच्या कोळसा उत्खननामुळे यवतमाळ व चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतीचे



व आर्थिक नुकसान होत असल्याने त्या पार्श्वभूमीवर शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नुकसानीचे पंचनामे व भरपाई संदर्भात योग्य कार्यवाहीसाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचे आदेश शासनाने दिनांक ३१ जुलै २०२५ रोजी दिले आहेत.

या संदर्भात आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने पाठपुरावा करत कोळसा उत्खननामुळे झालेल्या नुकसानीचे वास्तव मांडले होते. वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेडच्या कोळसा वाहतुकीच्या धुळीमुळे व खाण क्षेत्रातील कंपन्यांच्या स्फोटांमुळे शेतजमिनीचे होत असलेले नुकसान, पिकांच्या उत्पन्नात घट तसेच आर्थिक नुकसान अधोरेखित करण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने दखल घेत नुकसानीचे मूल्यांकन आणि त्यावरील उपाययोजना निश्चित करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. ही समिती नुकसानभरपाईसाठी आवश्यक सुधारित धोरण निश्चित करणार असू, यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. शेतकरी हितासाठी सातत्याने आवाज उठवणारे, त्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवणारे आणि प्रशासनाकडून तातडीची कृती घडवून आणणारे आ. सुधीर मुनगंटीवार हे या निर्णयाच्या केंद्रस्थानी राहिले. वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेडच्या उत्खननामुळे प्रभावित झालेल्या वणी सोबतच चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा त्यांनी समजून घेतल्या आणि त्याचे गांभीर्य अधोरेखित करत शासन स्तरावर प्रभावी पाठपुरावा केला. शेतजमिनीवरील मातीचे नुकसान, पिकांच्या उत्पादनात आलेली घट, धुळीच्या प्रदूषणामुळे आरोग्यावर होणारे परिणाम आणि आर्थिक नुकसान यांचा सविस्तर आलेख त्यांनी शासनासमोर मांडला.

या सखोल पाठपुराव्यामुळे शासनाने दखल घेत, विशेष समिती स्थापन करण्याचा आणि नुकसानभरपाईसाठी सुधारित धोरण आखण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामागे आ. सुधीर मुनगंटीवार यांची शेतकऱ्यांप्रती असलेली बांधिलकी, तळमळ आणि संवेदनशील दृष्टिकोन अधोरेखित होतो. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच शेतकऱ्यांच्या न्यायाच्या लढ्याला शासनमान्यता मिळाली आणि या निर्णयाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# प्रत्येक जिल्ह्यात नवोदय विद्यालयांची संख्या वाढवा

## दिल्लीत खा.धानोरकर यांची केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची भेट

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची दिल्ली येथे भेट घेऊन दोन महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. जवाहर नवोदय विद्यालयांमुळे आजवर हजारो गरीब मुलांना गुणवत्तेच्या आधारावर चांगले शिक्षण मिळाले आहे, आणि अनेक विद्यार्थ्यांनी मोठे हुद्दे मिळवले आहेत. मात्र सध्या प्रत्येक जिल्ह्यात केवळ एकच नवोदय विद्यालय असल्याने अनेक होतकरू विद्यार्थ्यांना या विद्यालयात शिक्षण घेणे शक्य होत नाही. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात दोन किंवा त्याहून अधिक विद्यालये उभारण्याची लोकहितकारी मागणी त्यांनी यावेळी केली. त्यासोबतच, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अभ्यासक्रमात भावी पिढीला भारतीय महान व्यक्तींच्या योगदानाचे महत्त्व कळावे आणि भविष्याकडे बघताना इतिहासाची जाणीव राहावी यासाठी महान व्यक्तींच्या योगदानाचा समावेश करण्याची प्रमुख मागणी देखील त्यांनी केली आहे.

यावेळी खा. प्रतिभा धानोरकर यांनी मंत्र्यांना सांगितले की, जवाहर नवोदय विद्यालये ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट शिक्षणाचे केंद्र आहेत. या विद्यालयांमुळे अनेक गरीब आणि हुशार विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळाले



आहे. सध्या महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात एक जवाहर नवोदय विद्यालय आहे, पण ग्रामीण विद्यार्थ्यांची वाढती संख्या पाहता ही संख्या अपुरी आहे. यामुळे अनेक पात्र विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे आणि त्यांना राष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करता यावे यासाठी प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन किंवा अधिक नवोदय विद्यालये सुरू करण्याची मागणी खा. प्रतिभा धानोरकर यांनी केली आहे.

यामुळे अधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल आणि ग्रामीण भागाच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळेल.तसेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबद्दल बोलताना खा. प्रतिभा धानोरकर यांनी सामाजिक विज्ञान अभ्यासक्रमात (इयत्ता ५ वी ते १० वी) भारतातील महान व्यक्तींचे विचार आणि कार्य समाविष्ट करण्याची विनंती केली आहे. त्यांनी विशेषत्वाने संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि संविधानातील महत्त्वाच्या घटकांचा समावेश करण्याची गरज असल्याची भावना व्यक्त केली, जेणेकरून युवा पिढीला संविधानाची मूल्ये आणि तत्त्वे समजू शकतील.

याचबरोबर, छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, विचार आणि त्यांची कुशल प्रशासन प्रणाली अभ्यासक्रमात समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल आणि ते राष्ट्रनिर्माणाच्या दिशेने पुढे जातील. तसेच, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे समाजसुधारक आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अभ्यासक्रमात असावे, जेणेकरून विद्यार्थी सामाजिक न्याय आणि महिला सक्षमीकरणाचे महत्त्व शिकू शकतील.

या मागण्यांमुळे विद्यार्थ्यांना भारताच्या समृद्ध वारशाची आणि वैविध्यपूर्ण इतिहासाची सखोल माहिती मिळेल. खा. प्रतिभा धानोरकर यांनी शिक्षणमंत्र्यांना या दोन्ही महत्त्वपूर्ण प्रस्तावांवर सकारात्मक विचार करण्याची विनंती केली आहे.

# टोयोटा किर्लोस्कर मोटर व महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** शाश्वत सामाजिक परिणाम व समग्र समुदाय विकासासाठी असलेल्या आपल्या दीर्घकालीन बांधिलकीनुसार, टोयोटा किर्लोस्कर मोटरने छत्रपती संभाजीनगर मधील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, बीडकिन येथे समग्र पायाभूत सुविधा विकासासाठी जिल्हा परिषदेबरोबर सामंजस्य करार केला.




हा सामंजस्य करार सोहळा जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडला आणि यावेळी प्रमुख मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये दिलीप स्वामी, जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर; अंकित, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद; तसेच शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी होते. टोयोटा किर्लोस्कर मोटर कडून सुदीप दळवी, चीफ कम्युनिकेशन ऑफिसर, वरिष्ठ उपाध्यक्ष व प्रमुख – स्टेट अफेयर्स आणि कंपनीतील अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बीडकिनमधील शाळेसाठीचा हा उपक्रम टोयोटाच्या या भागातील वाढत्या सहभागाशी सुसंगत असून महाराष्ट्रात उभारण्यात येणाऱ्या नवीन ग्रीनफिल्ड उत्पादन प्रकल्पातील गुंतवणुकीस पूरक आहे, जो औद्योगिक विकासाला चालना देणार असून रोजगार निर्मितीला हातभार लावणार आहे.टोयोटाच्या सीएसआर तत्त्वज्ञानातील शिक्षणाचा महत्त्वपूर्ण आधारस्तंभ टोयोटाच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी धोरणात शिक्षण हा मुख्य आधारस्तंभ आहे. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीशक्ती सक्षम करणे म्हणजे सर्वसमावेशक व शाश्वत सामाजिक प्रगतीचा पाया मजबूत करणे.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बीडकिन ही १०० वर्षांची जुनी संस्था असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि विविध सामाजिक पार्श्वभूमीतील मुलांना शिक्षण देते. विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीने ही शाळा परिसरातील सर्वात मोठ्या शासकीय शाळांपैकी एक आहे. सध्या येथे ८०० पेक्षा अधिक विद्यार्थी शिकत असून, लवकरच ही संख्या सुमारे १,२०० पर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे समावेशक आणि परिणामकारक शिक्षणासाठी शाळेच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे ही काळाची गरज आहे. या वाढत्या शैक्षणिक गरजांचा प्रतिसाद म्हणून, या उपक्रमाद्वारे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बीडकिन शाळेला एक आधुनिक, सर्वसमावेशक व भविष्यासाठी सक्षम शिक्षणपरिसरात रूपांतरित करण्याचे उद्दिष्ट आहे. हा उपक्रम २०२५ ते २०२८ या ३ वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने राबवण्यात येणार आहे.

# मध्यवर्ती पोलीस ठाण्याची कारवाई; आरोपी अटकेत, चोरीस गेलेली दुचाकी, रोख रक्कम जप्त

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०६, उल्हासनगर (ठाणे) :** मध्यवर्ती पोलीस स्टेशन हद्दीत दाखल गुन्हा क्रमांक ६१४/२०२५, BNS कलम ३०५, ३०३(२), ३(५) अन्वये कारवाई करत पोलिसांनी मोहम्मद सरफराज रुस्तम शेख या आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक दीपाली वाघ, गुन्हे शाखेचे सपोनि महेश काळे, पो.उपनिरीक्षक विलास मालशेटे, पो. हवा ६३४९ सूर्यवंशी, पो. हवा ८०८५ चौधरी आणि पो.शि. ५०९० धुळे यांनी संयुक्तरीत्या केला. पोलिसांनी आरोपीला



ताब्यात घेत त्याच्याकडून ३००० रोख रक्कम, ३ अँड्रॉइड मोबाईल फोन आणि दुचाकी (MH05CD3308) जप्त केली आहे. तपासात उघडकीस आले आहे की, सदर दुचाकी बदलापूर पूर्व पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्हा क्रमांक ४५२/२०२५, इछड ३०३(२) मधून चोरीस गेली होती.सदर माहितीच्या आधारे आरोपीस अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे. पोलिसांकडून या गुन्ह्यात इतर कोणाचा सहभाग आहे का, याचा शोध घेतला जात आहे. पोलिसांच्या माहितीनुसार लवकरच या प्रकरणातील इतर आरोपीही अटकेत येण्याची शक्यता आहे.

# थोडक्यात

## राजीव गांधी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०६, मुदखेड (नांदेड) :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न झाला. या समारंभाचे अध्यक्षस्थानी शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेडचे सहसचिव प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्रदादा चव्हाण तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.टी.शिंदे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेच्या पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने झाली. महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी संचाकडून विद्यापीठ गीत सादर करण्यात आले. प्राचार्य डॉ.ए.टी. शिंदे यांनी महाविद्यालयाची यशोगाथा, प्राध्यापकांचे विद्यार्थ्यांप्रती असलेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांचे परिश्रम आणि समाजोपयोगी नागरिक घडवण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाची भूमिका अधोरेखित केली. प्रमुख पाहुणे नरेंद्रदादा चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी पदवी शिक्षणासोबतच विविध कौशल्य आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. येणारा काळ हा एआय तंत्रज्ञानाचा असेल त्यामुळे विशेषतः येणाऱ्या ई-युगात स्वावलंबन आणि नाविन्यपूर्णतेकडे वाटचाल करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी सॉफ्ट स्किल्स आत्मसात करून नोकरी करणारा न होता नोकरीत देणार होणे ही देशाची गरज आहे.

अध्यक्षीय समारोप करताना रावसाहेब शेंदारकर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत म्हटले की, पदवी ही केवळ एक सर्टिफिकेट नाही, तर ती एक जबाबदारी आहे. ही जबाबदारी पार पाडल्यास तुम्ही सक्षम नागरिक बनाल. या पुढील शिक्षणात आणि जीवनात कठोर परिश्रम करून यश संपादन करा. यानंतर महाविद्यालयातील बी.ए., बी.एस्सी. आणि बी.कॉम. या शाखांतील पदवी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदव्या वितरित करण्यात आल्या. या समारंभाचे संयोजन महाविद्यालयाच्या परीक्षा विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.मयूर दरबेश्वर यांनी केले. सुंदर सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. दत्ताजी मेहेत्रे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा.डॉ.राहुल धावरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आर्च डेव्हलपमेंट फाऊंडेशनचे सरळगावमध्ये उन्नती स्किल सेंटरचे उद्घाटन




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, ठाणे :** महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणासाठीत्यांच्यात आत्मविश्वास व नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी त्यांच्यामध्ये कौशल्ये विकसित करून त्यांना कुटुंब व समाजामध्ये निर्णय घेणारी भूमिका बजावता यावी यासाठी I.I.F. (इंटरनॅशनल फ्लेवर्स अँड फ्रॅग्रन्स) आणि आर्च डेव्हलपमेंट फाउंडेशन, वडोदरा यांच्या संयुक्त विद्यमाने CSR उपक्रमांतर्गत हैदराबाद येथील बंदलगुडा आणि मुरबाड येथील सरळगाव येथे 'प्रोजेक्ट उन्नती' सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पामार्फत सुमारे १० गावांमधील सुमारे १००० महिलांपर्यंत आणि सुमारे ५०० किशोरवयीन मुलींपर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमाअंतर्गत महिलांच्या विकासासाठी एक कौशल्य विकास केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रामध्ये शिलाई मशीन प्रशिक्षण वर्ग मोफत घेतले जाणार आहेत. याशिवाय इतर कौशल्यविकासाचे प्रशिक्षण वर्ग देखील लवकरच सुरू केले जातील. या केंद्राचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी I.I.F. चे फ्रॅग्रन्स प्रमुख सुमित मेहता प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच आर्च डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या CEO सोनकी शाह, I.I.F. चे CSR प्रमुख कार्तिक पलानी, सरळगावचे ग्रामविकास अधिकारी वाघमारे, सरपंच सविता एगडे, उपसरपंच राजेश्री झुंझारराव, माजी सरपंच अलका दिनकर, ढ्ढउ बँकेचे व्यवस्थापक दिपक घुडे आणि ॲडव्होकेट प्रफुल्ल रोकडे हे मान्यवर ही विशेष उपस्थित होते. या सशक्तीकरण कार्यक्रमामध्ये सुमारे १० गावांमधील एकूण २२५ महिला उपस्थित होत्या.

## पनवेल मनपा, डायमंड स्पिरिट फाउंडेशन मार्फत वृक्षारोपण




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, पनवेल :** महानगरपालिका उद्यान विभाग, डायमंड स्पिरिट फाउंडेशन न्यू पनवेल यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकताच कोकण मोटर्स जवळ तक्का परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे. वृक्षारोपण तसेच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व नागरिकांना समजावे यादृष्टीने महापालिका विविध उपक्रम राबवित आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बहावा, करंज, कदंब, कांचन अशा विविध ३५ देशी रोपांचे वृक्षारोपण केले. या कार्यक्रमासाठी डायमंड स्पिरिट फाउंडेशन न्यू पनवेलच्या अध्यक्षा नम्रता धनवडे, सदस्या नृपाली जोशी तसेच इतर सदस्य उपस्थित होते. रोपांच्या सुरक्षेसाठी त्यांच्याकडून ट्री गार्ड पुरवण्यात आले. लोकसहभागातून वृक्षारोपणाचे प्रमाण वाढवण्यासाठी सहाय्यक आयुक्त डॉ. रुपाली माने, विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे, अशोक मुने तसेच सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक किरण गायकवाड, गजलक्ष्मी आंबे, अजय डांगरकर यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

## शिवाजीराव भांगे यांचे निधन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील मौजे खांबाळा येथील माजी पोलीस पाटील शिवाजीराव गणपतराव भांगे यांचे दिनांक ०६ ऑगस्ट २०५ रोजी सायंकाळी ४ वाजत वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे मृत्यूसमयी वय ७५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुली, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर अंतिम अंत्यसंस्कार दि.०७ ऑगस्ट रोजी दुपारी ०१ वाजता खांबाळा येथील स्मशानभूमीत करण्यात येणार आहेत. काँग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ते दत्तराम भांगे पाटील यांचे ते बंधू होत.